पुण्यनगरी दि 29/01/2019

# कोळशासह चोरीला गेलेला ट्रक जप्त

## रामनगर पोलिसांचे यश

## आरोपी फरार



**चंद्रपूर :** कोळसा भरून असलेल्या ट्रक अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. मात्र, पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी नाकाबंदी केल्याने एमआयडीसी दाताळा येथे ट्रक उभा करून चोरट्याने पोबारा केला. दरम्यान, पोलिसांनी ट्रक ताब्यात घेतला आहे.

मोहम्मद नसीम जमाल खान (४२) रा. रयतवारी कॉलरी चंद्रपूर यांच्या मालकीचा ट्रक क्रमांक एमएच ३४/एबी ९५३४ हा लखमापूर येथून अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार २८ जानेवारी रोजी रामनगर पोलीस ठाण्यात खान यांनी दिली. तक्रार प्राप्त होताच ठाणेदार अशोक कोळी यांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल करून वेगाने तपासाची चक्रे फिरवून नाकाबंदी केली. दरम्यान, चोरीतील ट्रक एमआयडीसी येथे उभा असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी कोळसा भरलेला ट्रक ताब्यात घेतला. मात्र, आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. फरार आरोपीचा रामनगर पोलीस शोध घेत आहे. ६२ हजार रुपये किमतीचा कोळसा आणि २२ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण २२ लाख ६२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल रामनगर पोलिसांनी जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, एसडीपीओ सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार अशोक कोळी यांच्या नेतृत्वात डीबी पथकाचे एपीआय दरेकर, पाटील, गजानन डोईफोडे, राठोड, माजिद यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सकाळ दि 29/01/2019

# कोळसा भरलेला ट्रक जप्त

**चंद्रपूर, ता. २८ :** लखमापूर येथून कोळसा भरलेला ट्रक चोरट्याने पळविल्याची घटना सोमवारी (ता. २८) घडली. याची तक्रार रामनगर पोलिसांत करण्यात आली. पोलिसांनी दाताळा एमआयडीसी परिसरातून कोळसा भरलेला ट्रक जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मालाची किमत २२ लाख रुपये आहे. यातील आरोपी सध्या पसार आहे.

मोहम्मद नसीम जमाल खान यांच्या मालकीचा कोळसा भरलेला



चंद्रपूर : जप्त केलेला ट्रक.

एमएच ३४ बी ९५३४ या क्रमांकाचा ट्रक लखमापूर परिसरातून चोरून नेला होता. याची तक्रार त्यांनी रामनगर पोलिसांत केली. गुन्हे शोध पथकाने तपासाची चक्रे फिरविली. तपासादरम्यान एमआयडीसी दाताळा येथे कोळसा भरलेला ट्रक आढळून आला. तो पोलिसांनी ताब्यात घेतला. या ट्रकमध्ये ३१ टन कोळसा होता. त्याची किमत ६२ हजार ४८६ रुपये आहे. ट्रकची किमत २२ लाख रुपये आहे. ही कार्यवाही उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या नेतृत्वात पोलिस निरीक्षक अशोक कोळी, सहायक पोलिस निरीक्षक दरेकर, हवालदार पाटील, डोईफोडे, राठोड यांनी केली.

नवभारत दि 29/01/2019

# कोयला व ट्रक सहित 22 लाख का माल जब्त

चंद्रपुर (का). कोयले से भरा ट्रक चोरी मामले में पुलिस ने कार्रवाई कर कोयला और ट्रक को जब्त करने में सफलता हासिल की. सोमवार को रैयतवारी कालरी निवासी मोहम्मद नसीम जमाल खान (42) ने रामनगर पुलिस थाने में शिकायत दी. इसमें उसने बताया कि उसका 14 पहिया कोयले से भरा ट्रक क्र. एमएच-34 एबी-9534 लखमापुर से किसी अज्ञात चोर ने चुरा लिया. शिकायत के आधार पर रामनगर पुलिस ने अज्ञात चोर के खिलाफ ट्रक चोरी का मामला दर्ज किया. रामनगर पुलिस थाने के अपराध अन्वेषण विभाग ने जांच प्रक्रिया शुरू की. जानकारी के अनुसार एमआईडीसी दाताला परिसर में उक्त ट्रक के मौजूद होने की सूचना पुलिस को मिली. पुलिस ने जाकर देखा, तो चोरी हुआ ट्रक क्र. एमएच-34 एबी-9534 कोयला समेत खड़ा मिला, जबकि उसे चोरी करने वाला चोर फरार था. पुलिस ने 22 लाख का ट्रक और उसमें 62,486 रुपये का 31 टन कोयला कुल 22 लाख 62 हजार 486 रुपये का माल जब्त किया. कार्रवाई पुलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी के मार्गदर्शन में उपविभागीय पुलिस अधिकारी सुशीलकुमार नायक के नेतृत्व में पुलिस निरीक्षक अशोक कोली सहित सहायक पुलिस उपनिरीक्षक दरेकर, पुलिसकर्मी पाटिल, डोईफोड़े, राठोड़, माजिद ने की.

लोकमत दि २९/०१/२०१९

## पालकमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ : चंद्रपूर पोलिसांचे विशेष पाऊल

# 'पोलीस सारथी' घेणार महिला व मुलींची काळजी

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : काही कारणास्तव एखाद्यावेळेस महिला व मुलींना रात्री, मध्यरात्री बाहेर पडावे लागते. अशावेळेस अनेक महिला व मुलींना छेडखाणीच्या प्रकाराला सामोर जावे लागत असल्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. मात्र आता चंद्रपूर पोलिसांनी 'पोलीस सारथी' हा उपक्रम सुरु केला असून या उपक्रमाद्धारे रात्री १० ते पहाटे ५ वाजताच्या दरम्यान संकट ओढावलेल्या स्त्रियांनी पोलिसांना फोन व मॅसेजद्वारे माहिती दिल्यास पोलीस आपल्या वाहनात बसवून त्यांना घरी सोडणार आहेत. या उपक्रमाचे शनिवारी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

रात्री बसस्थानक, रुग्णालयात किंवा इतर ठिकाणी महिला आणि मुली अनेकदा अडकतात. अशा वेळेस त्यांना मदत मिळत नाही. विशेषत: त्यांच्याकडे घरापर्यंत पोहोचण्यासाठी साधन उपलब्ध नसते. अशा परिस्थिती एखादा अनोळखी व्यक्तीकडून मदत मागणे धोकादायक ठरु शकते. मदतीच्या बाहाण्याने महिलांवर अत्याचार केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अशा परिस्थिती रात्रीच्या सुमाराला संकटात अडकणाऱ्या महिलांना सुरक्षेचा विश्वास आणि संरक्षणाची हमीसाठी चंद्रपूर पोलिसांनी पोलीस सारथी उपक्रमाचा शुभारंभ केला.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने महिला आणि मुली उपस्थित होत्या. ही योजना जिल्हाभरात राबविली जाणार आहे. यासाठी पोलीस दलास सहा अतिरिक्त वाहन दिले जाईल, असे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले. सध्या उपलब्ध वाहन आणि संसाधनातच ही योजना राबविली जाणार आहे.



शुभारंभाप्रसंगी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, एसपी डॉ. महेश्वर रेड्डी व अन्य.

### मदतीसाठी क्रमांक

◆ रात्री १० ते सकाळी ५ या दरम्यान संकटात सापडलेल्या महिला आणि मुलींना मदत हवी असल्यास पोलीस नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक (०७१७२-२५१२००, २६३१००, २७३२५८), महिला हेल्पलाईन (१०९१) आणि व्हॉट्सॲप (९४०४८७२१००) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. संकटातील महिलांना पोलीस घरापर्यंत सोडून देईल. हा याच योजनेचा हेतू आहे.

The Hitavada Date 29/01/2019

# Chanda cop start pick-and-drop service for women out late in night

**Chandrapur Bureau**
CHANDRAPUR, Jan 28

CHANDRAPUR Police have launched a unique safe pick-and-drop service for safety for distressed women and girls' who are out late in the night. The scheme called 'Police Sarthi' was launched at the hands of Sudhir Mungantiwar, State's Finance And Planning Minister and Guardian Minister of Chandrapur, on Republic Day.

The scheme provides safety to women and girls who are out late in the night for some work and feel unsafe in any kind of situation. Chandrapur Police will reach the women giving a distress call and ensure her safety and escort her to her house safely from 10 pm to 5 am. The slogan of 'Police Sarthi' 'Amhi Gheto Mahila va Mulinchi Kalji' (We take care of women and girls) highlights priority of Police Department towards the safety of women and girls. The scheme would particularly ensure the safety of the women and girls who works in night shift or have to return late in the night from their workplace.

Officials informed that any women or girl can call police by phone at Police Headquarter ( 07172-251200, 263100, 273258) or toll free number women's helpline number 1091. Department has also issued a 'WhatsApp' number (9404872100) where women can send distress message in emergency situation to summon help. Police Department has informed that any women seeking help can call Police Headquarters or helpline numbers without any hesitation and their team will reach out to help them. Department is going to put posters, hoarding and stickers detailing scheme and its helpline numbers all over the city. They have, however, urged citizens not to misuse the scheme.



Team of Police Sarthi present during the launch of the scheme.

Guardian Minister Sudhir Mungantiwar launched the scheme in presence of large number of women and citizens on the police ground during the main flag hoisting ceremony to mark Republic Day.

Those present on the ground welcomed the scheme and maintained that it will bring more confidence and sense of safety among women and girls going out in the night for some work. Later, talking to media persons, Guardian Minister Sudhir Mungnatiwar informed that he is going to provide extra vehicles to the Police Department for the execution of the scheme. He also stated that if the schemes bears positive outcome, it will be expanded to other areas.